
लोकमत

# संशोधन अहवाल लेखन करताना पद्धती लक्षात घ्या

## गुरव : विद्यापीठात ऑनलाईन व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्रत्येक संशोधकाने



संशोधन अहवालाचे लेखन करताना संशोधन विषय, संशोधन पद्धती आणि अहवाल लेखनाची भाषा या गोष्टी सातत्याने लक्षात घेतल्या पाहिजेत. त्यामुळे संशोधन गुणवत्तापूर्ण, दर्जेदार व उपयुक्त होईल, असे प्रतिपादन कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी रविवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्यावतीने संशोधन पद्धती या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानमालेतील संशोधन अहवाल लेखन या विषयावरील पाचवे पुष्प त्यांनी गुंफले. संशोधन अहवाल हा आपल्या संशोधन कार्याचा निरंतर जपला जाणारा पुरावा असतो. यासाठी अत्यंत सूक्ष्मपणे अभ्यास करावा. सूक्ष्मतेने त्या माहितीचे अहवाल लेखन करणे गरजेचे असल्याचे डॉ. गुरव यांनी व्याख्यानात सांगितले.

संशोधन ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असून या प्रक्रियेसाठी आवश्यक तात्त्विक माहितीचा प्रत्येक संशोधकाने अभ्यास करणे गरजेचे आहे. आपण ज्यावेळी संशोधन अहवाल लेखनाच्या टप्प्यावर येतो, तेव्हा आपल्या विषयाची सर्व माहिती आपल्यासमोर असली पाहिजे. यासाठी संशोधनाच्या सुरुवातीपासून संशोधनाच्या सर्व नोंदी करून ठेवण्याची सवय लावून घेतली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. महेश चव्हाण यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठ ऑनलाईन परीक्षेला ६ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने रविवारी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेला ७ हजार १९४ पैकी ६ हजार १७९ विद्यार्थी उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्रातील परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरू आहेत. चक्रीवादळामुळे १७ व १८ मे रोजीच्या काही परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. विद्यापीठाच्या वतीने रविवारी घेण्यात आलेल्या काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत झाल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

पुण्यनगरी

# मेहनत, संशोधन यशाचे गमक - डॉ. ए. एम. गुरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रत्येक संशोधक विद्यार्थ्याने संशोधन कार्य सुरू असताना सातत्याने आपल्या विषयाशी प्रामाणिक राहून प्रचंड मेहनत केल्यास दर्जेदार व गुणवत्तापूर्ण संशोधन पूर्ण करता येईल. हेच संशोधन पूर्णत्वाच्या यशाचे गमक असेल, असे मत कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे संशोधन पद्धती या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानमालेतील संशोधन अहवाल लेखन या विषयावरील पाचवे पुष्प गुंफताना ते बोलत होते. डॉ. गुरव म्हणाले, संशोधन ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असून, या प्रक्रियेसाठी आवश्यक तात्त्विक माहितीचा प्रत्येक संशोधकाने अभ्यास करणे गरजेचे आहे. आपण ज्यावेळी संशोधन अहवाल लेखनाच्या टप्प्यावर येतो, तेव्हा आपल्यासमोर आपल्या विषयाची इत्थंभूत माहिती आपल्यासमोर असली पाहिजे. यासाठी संशोधनाच्या सर्व नोंदी करून ठेवण्याची सवय लावून घेतली पाहिजे, जेणेकरून आपले संशोधन गुणवत्तापूर्ण, दर्जेदार व उपयुक्त होईल. आभार महेश चव्हाण यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 MAY 2021

तरुण भारत

# जैवविविधता टिकली तरच मानव टिकेल

## शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागाचे डॉ. ए. डी. जाधव यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

जैवविविधतेतील वनस्पती, प्राणी, पक्षी जगले तरच पर्यावरणाचा समतोल व मानवी जीवन सुखी आणि समृद्ध होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनक्युबेशन इन सेरीकल्चरचे समन्वयक व महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे सदस्य डॉ. ए. डी. जाधव यांनी केले.

जागतिक जैवविविधता दिनानिमित्त शहाजी महाविद्यालयातील पर्यावरण विभाग व आय. क्यु. ए. सी.च्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य

### शहाजी महाविद्यालयात जागतिक जैवविविधता दिनानिमित्त ऑनलाईन व्याख्यान

डॉ. आर. के. शानेदिवाण होते. याप्रसंगी ज्येष्ठ पर्यावरणवादी नेते डॉ. सुंदरलाल बहुगुणा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



डॉ. जाधव म्हणाले, मानवाने विकासाच्या नावाखाली व आपल्या हव्यासापोटी प्रचंड वृक्षतोड केली आहे. त्यामुळे पशु, पक्षी, प्राण्यांचे निवासस्थान धोक्यात आले आहे. पर्यावरण संतुलनावरचे विघातक परिणाम मानवालाच सोसावे लागणार आहेत. धोक्याची जबाबदारी मानवाने घेतली नाही तर आपण स्वत:च्या विनाशाकडे वाटचाल करीत आहोत हे ओळखावे. आपल्या राहत्या घराचे व परिसराचे उदाहरण देऊन आपण छोट्या छोट्या गोष्टीतून जैवविविधता टिकवू शकतो. जैवविविधतेसाठी राबविल्या विविध शासकीय योजनांचा लाभ घेऊन आपणही जैवविविधता टिकवून ठेवण्यात हातभार लावावा असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण म्हणाले, मानव म्हणून आपण नेहमीच जैवविविधतेच्या संरक्षणासाठी सजग राहिले पाहिजे. विद्यापीठ परिसरातील वनस्पती व विविध जैवविविधतेच्या संगोपनामुळे कित्येक टन ऑक्सिजन निर्मिती होत आहे. प्रास्ताविक पर्यावरण विभागप्रमुख प्रा. दिपा पाटील यांनी केले. आभार आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. एन. एस. जाधव यांनी मानले. ऑनलाईन व्याख्यानमालेचे तांत्रिक संयोजन प्रा. विशाल पुंदीकर व गणेश पाटील यांनी केले. या व्याख्यानमालेला संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजयराव बोंद्रे, प्रबंधक रवींद भोसले, अधीक्षक मनिष भोसले यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.